# सुलभा ब्रह्मे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'वैज्ञानिक आणि बुद्धिप्रमाण्यवादी दृष्टिकोनातून वैचारिक चळवळीचे काम पुढे नेणे हीच सुलभा ब्रह्मे यांना खरी श्रद्धांजली ठरेल,' अशी भावना विविध मान्यवरांनी रविवारी व्यक्त केली. 'वैचारिक शुद्धता आणि प्रखरतेचा आग्रह धरणाऱ्या सुलभाताई हुकुमशाही प्रवृत्तीविरोधात लढा देण्याची तयारी करीत होत्या,' याकडे या वेळी लक्ष वेधण्यात आले.

ज्येष्ठ मार्क्सवादी विचारवंत, अर्थतज्ज्ञ व कार्यकर्त्या डॉ. सुलभा ब्रह्मे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी समविचारी संघटनांतर्फे आयोजित सभेत किरण सोघे, डॉ. माधव गाडगीळ, एस. पी. शुक्ल, भालचंद्र केरकर, रझिया पटेल, श्री. ना. गुत्तीकर, के. ई. हरदास, प्रा. अजित अभ्यंकर, नारायण जोशी, किशोर ढमाले, मनोहर टाकसाळ, आशू सक्सेना, संजीवनी मुळे, मिलिंद चंपानेरकर, कुमार शिराळकर, प्राचार्य म. ना. कांबळे यांनी ब्रह्मे यांच्या आठवणींना उजाळा दिला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या शांता रानडे सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या.

'सुलभा माझ्यापेक्षा दहा वर्षांनी मोठी होती. तिचे विश्व वेगळे होते. ज्या मूल्यांसाठी सुलभा आयुष्यभर झटत राहिली ती मूल्ये तिने आमचे बाबा डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्याकडून आत्मसात केली होती,' असे गाडगीळ यांनी सांगितले. 'नोटाबंदीच्या विरोधात काही तरी केले पाहिजे असे त्यांच्याशी झालेल्या दूरध्वनी संवादातून सुलभाताईंनी मला सांगितले होते. मात्र, दुसऱ्याच दिवशी त्या आपल्यात नसल्याचे वृत्त समजले,' असे शुक्ल यांनी सांगितले.